# मंडल
# आयोगाच्या शिफारशी

-के. टी. गिरमे

किंमत रु. २/-

शुभेच्छा

# सावळे वाघीरे आणि कंपनी लि.

१०९, भवानी पेठ, पुणे ४११ ००२

**SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY**
**PUNE 411 004.**

CN
AcN 199790
Date of release for loan

This book should be returned on or before the last date stamped below.

*An overdue charge of 25 paise will be levied for each day the book is kept beyond this date.*

शुभेच्छा !

सावळे वाघीरे आणि कंपनी लि.,

१०९, भवानी पेठ, पुणे ४११ ००२

# मंडल आयोगाच्या शिफारशी

## अनुसूचित जाति-जमातींना सवलती

भारतीय राज्यघटना बनविताना देशातील सामाजिक परिस्थितीचे संपूर्ण चित्र घटनाकारांच्या समोर होते. देशातील दुर्बल व मागासलेल्या समाजाकरता काही विशिष्ट तरतूद करण्याचे त्यांनी ठरविले. अनुच्छेद ३३० व ३३१ अन्वये अनुसूचित जाती व जमाती यांना लोकसभेत व प्रत्येक राज्यांच्या विधानसभेत राखीव जागा ठेवण्यात आल्या तर अनुच्छेद ३३५ अन्वये संघराज्य व राज्य यांच्या कारभाराच्या संबंधातील पदावर व सेवांमध्ये नियुक्ती करताना त्यांना राखीव जागा देण्याची तरतूद केली. १९५० साली राष्ट्रपतींनी जाहीर अधिसूचनेद्वारा अनुसूचित जाती व जमाती यांची राज्यवार यादी प्रसिद्ध केली. श्री. य. दि. फडके यांनी "राखीव जागांबाबत वस्तुस्थिती" या लेखात यासंबंधी असे म्हटले आहे की, "भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकारांनी जे वरील धोरण घोषित केले गेले त्याला 'संरक्षक भेदभावाचे' धोरण म्हणण्याचा परिपाठ आहे. त्यापेक्षा त्याला 'भरपाईदाखल न्याय' म्हणणे अधिक उचित ठरेल. शतकानुशतके अस्पृश्य मानले गेल्यामुळे हरतऱ्हेच्या अन्याय-अपमानास तसेच शोषणास तोंड द्यावे लागणाऱ्या दलितांना किंवा लुबाडल्या गेलेल्या दीनदुबळ्या, निरक्षर आदिवासींना काही काळपर्यंत विशेष सोयी सवलती द्याव्यात. त्यांच्यासाठी जागा राखीव ठेवून त्यांना अन्य भारतीय नागरीकांबरोबर विषम स्पर्धा करावयास भाग न पाडता त्यांचा विकास साधावा म्हणजे कालांतराने त्यांना प्रगतीच्या वाटा मोकळ्या होतील असे भारतीय घटनेच्या शिल्पकारांना वाटत होते. लोकसभेत व विधानसभेत जागा राखून ठेवण्याचे धोरण जास्तीत जास्त तीस वर्षे अनुसरावे लागेल असा त्यांचा होरा होता. या काळात अनुसूचित जाती-जमातींची शैक्षणिक उन्नती होईल व सरकारी नोकऱ्यात त्यांना पुरेसे प्रतिनिधित्व दिले जाईल अशी अपेक्षा होती." प्रत्यक्षतः हे धोरण कसे अमलात आणले जाते हे पाहण्यासाठी एक आयुक्त नेमण्याची तरतूद अनुच्छेद ३३९ यात करण्यात आली.

## इतर मागासलेले वर्गासाठी तरतूद

अनुसूचित जाती व जमातींखेरीज इतर मागासलेल्या वर्गांना काय सवलती द्याव्या याबाबत संघराज्य व राज्यसरकारांना अधिकार देण्याची तरतूद अनुच्छेद १६ (४) यात करण्यात आली.

अनुच्छेद १६ (४) – "या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे राज्यांच्या सेवामध्ये नागरिकांपैकी ज्या कोणत्याही मागासवर्गाला (Backward Class) राज्यांच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व नाही अशा वर्गाकरता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्याची कोणतीही तरतूद करण्याला राज्याला प्रतिबंध होणार नाही."

संविधानाच्या अनुच्छेद ३४० अन्वये भारताच्या राज्यक्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टचा मागासलेल्या वर्गाच्या ( Socially and educationally backward classes ) स्थितीचे अन्वेशण करण्यासाठी आयोगाची नियुक्ती करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला.

## जातीविषयक सरकारी आदेश

मॉटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणेनंतर वेगवेगळ्या राज्यसरकारांनी दलित व इतर मागास वर्गाला शैक्षणिक क्षेत्रात व सेवामध्ये राखीव जागा देण्यास सुरुवात केली. या बाबतीत उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतात इतर मागासवर्गाची उन्नती करण्यासाठी फार मोठचा प्रमाणावर प्रयत्न करण्यात आला. महाराष्ट्रात ब्राह्मणेतर पक्षाने, म्हैसूर राज्यात प्रजापक्षाने व मद्रास राज्यात जस्टीस पार्टीने फार मोठी आंदोलने केली. मद्रास राज्यात १९१९च्या कायद्यान्वये विधानसभेतील ६५ जागांपैकी २४ जागा ब्राह्मणेतरासाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. १९२२ साली जस्टीस पार्टी सत्तारूढ झाली व १९२७ साली " जातीविषयक सरकारी आदेश " मंजूर करण्यात आला. या आदेशानुसार एकूण १४ जागा भरावयाच्या असल्या तर त्याची वाटणी ब्राह्मण–२, ब्राह्मणेतर हिंदू–६, मागासलेले हिंदू–२, दलित–२, अग्लोइंडियन किंवा ख्रिश्चन–१ व मुसलमान–१ अशा प्रमाणात केली जात असे. असे वाटप केवळ जातीच्या आधारावर केले जात होते असे नसून ते धर्माच्या आधारावरही केले जात होते.

## आदेश घटनाविरोधी ठरला

२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात आल्यावर संविधानातील पंधराव्या अनुच्छेदाच्या पहिल्या खंडाच्या व एकोणतीस अनुच्छेदातील दुसऱ्या खंडाच्या आधारे मद्रास सरकारच्या जातीय आदेशास मद्रासच्या उच्च न्यायालयात हरकत घेण्यात आली. चंपकन दोराईराजन नावाच्या विद्यार्थीनीला मद्रासच्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश पाहिजे होता पण जातवार जागा वाटप करण्याच्या धोरणामुळे अन्य जातीच्या उमेदवारापेक्षा तिला अधिक गुण मिळालेले असताना प्रवेश नाकारण्यात आला. ज्या अनुच्छेदाच्या आधारे अर्ज करण्यात आला ते अनुच्छेद पुढीलप्रमाणे होते.

**अनुच्छेद १५ (१)** – राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव केला जाणार नाही.

**अनुच्छेद २९ ( २ )** – राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शिक्षणसंस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

मद्रासच्या उच्च न्यायालयाने श्रीमती दोराईराजन हिचे म्हणणे ग्राह्य धरून जातीय आदेश घटनाविरोधी ठरविला. त्या निकालाविरुद्ध मद्रास सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले पण सर्वोच्च न्यायालयाने ते फेटाळून लावून उच्च न्यायालयाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले.

**घटना दुरुस्ती**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध पेरियर रामस्वामी नायकर यानी मद्रास राज्यात राज्यव्यापी प्रखर आंदोलन उभे केले. १४ ऑगस्ट १९५० रोजी मद्रास शहरात कडक हरताळ पाळण्यात आला व मागासवर्गीयांचा विराट मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनाची लाट संपूर्ण देशभर पसरण्याचा धोका लक्षात घेऊन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी घटना दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १९५१ साली संविधान (पहिले विशोधन) अधिनियम संमत करण्यात आला व या अधिनियमान्वये अनुच्छेद १५ मध्ये पुढील खंड (४) घालण्यात आला.

**अनुच्छेद १५ (४)** – या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरता कोणतीही तरतूद करण्यास प्रतिबंध होणार नाही.

घटनादुरुस्तीची चर्चा २९ मे ते २ जून १९५१ रोजी झाली. 'सामाजिक व शैक्षणिक मागास' या संज्ञेबरोबर 'आर्थिक मागासलेपण'ही जोडण्यात यावे अशी सूचना प्रा. के. टी. शहा यांनी मांडली असता त्या उपसूचनेला पंडित नेहरू व डॉ. आंबेडकर यांनी प्रखर विरोध केला. अनुच्छेद १५ खंड (४) मधील शब्दयोजना जातीव्यवस्था किंवा धार्मिक भेदाभेद या संदर्भात केली असल्याचे पंडित नेहरू यांनी सांगितले. अनुच्छेद १५ खंड (४) मध्ये "सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेले" असा शब्दप्रयोग आहे, तर अनुच्छेद १६ खंड (४) यात मागासवर्ग असे म्हटले आहे. अनुच्छेद ३४० च्या संदर्भात अनुच्छेद १५ खंड (४) ची शब्दयोजना करण्यात आली असे पंडित नेहरू यांनी आपल्या भाषणात सांगितले.

अनुच्छेद १५ खंड (४) संबंधी बोलताना वर्ग म्हणजे अनेक जातींचा समूह असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले. हा अर्थ सर्वोच्च न्यायालयाने एका निवाड्यात मान्य केला.

## कालेलकर आयोगाची नियुक्ती

भारतीय घटनेत अन्य मागासवर्गीयांसाठी सवलतींची तरतूद करण्यात येऊनही केंद्र सरकारने त्या दृष्टीने कोणतीही कृती केली नाही तेव्हा अन्य मागासवर्गीयांच्या संघटनांनी व नेत्यांनी आंदोलन सुरू केले. परिणामत: सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या स्थितीचे अन्वेषण करण्यासाठी राष्ट्रपती यांनी २९ जानेवारी १९५३ रोजी एक आयोग नियुक्त केला. त्या आयोगाचे अध्यक्ष श्री. काकासाहेब कालेलकर होते व त्यांच्याशिवाय इतर दहा सदस्य नियुक्त करण्यात आले होते. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग कोणत्या निकषावर ठरविण्यात यावे हा एक प्रश्न आयोगाकडे सोपविण्यात आला होता. आयोगाने आपला अहवाल १९५५ साली राष्ट्रपतींना सादर केला व त्या अहवालाची प्रत लोकसभेपुढे ३ सप्टेंबर १९५६ रोजी ठेवण्यात आली. आयोगाच्या अकरा सदस्यांपैकी पाच सभासदांनी अहवालाला भिन्न मतपत्रिका जोडल्या होत्या. आयोगाचे अध्यक्षांनी अहवाल तयार करताना बहुमताच्या बाजूने आपले मत नोंदविले, पण अहवालासोबत पाठविलेल्या पत्रात 'जात' हा मागासलेपणाचा निकष ठरविण्यास आपला विरोध असल्याचे नमूद केले. आयोगाने पुढील पाच शिफारशी केल्या–

(१) १९६१ च्या शिरगणतीच्या वेळी लोकसंख्येची जातवार नोंदणी करावी.

(२) हिंदू समाजाच्या पारंपारिक जातीप्रथेतील हीन स्थान हे मागासलेपणाचे लक्षण समजावे.

(३) सर्वच स्त्रियांची मागासलेल्या वर्गात गणना करावी.

(४) तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणसंस्थांत मागासलेल्या जातीतील लायक विद्यार्थ्यांसाठी ७० टक्के जागा राखून ठेवाव्यात.

(५) सरकारी व स्थानिक संस्थांच्या सेवेत आरक्षणाचे प्रमाण श्रेणी १–२५ टक्के, श्रेणी २–३३·३ टक्के, ३ व ४–४० टक्के असे असावे.

कालेलकर आयोगाने आपल्या संशोधनातून एकूण २३९९ मागासवर्गाची यादी तयार केली. त्यापैकी ९३० जातींची मिळून ११·५ कोटी लोकसंख्या होत होती. त्यात अनुसूचित जातिजमातींचे ७ कोटी मिळविले तर १८·५ कोटी लोकसंख्येचा हा प्रश्न होता. ही यादी तयार करताना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या जातींचे वर्गीकरण करण्यासाठी कोणती कसोटी वा निकष ठरवावा या बाबतीत

आयोगाचे एकमत झाले नाही. बहुमताने स्वीकारलेली 'जात' कसोटी सरकारला मान्य नव्हती. सामाजिक व शैक्षणिक मागासपण ठरविण्यासाठी निश्चित निकष शोधण्याची आवश्यकता आहे असे गृहमंत्र्यांनी आपल्या निवेदनात म्हटले. या अहवालावर संसदेत कसलीही चर्चा झाली नाही. भारत सरकारने स्वतःची अशी कसोटी निश्चित करण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण तोही यशस्वी झाला नाही. अखेर गृहमंत्र्याने सर्व राज्यांना कळविले की, राज्यसरकारांनी आपल्या विवेकाने अशी कसोटी ठरवावी, पण भारत सरकारचे मत असे आहे की, जातीपेक्षा आर्थिक कसोटी लावणे अधिक युक्त ठरेल.

## निरनिराळ्या राज्यातील सवलती

राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर अनेक राज्यांनी मागासवर्ग आयोगाची नियुक्ती करून त्यांच्या अहवालानुसार मागासवर्गाची यादी आणि शैक्षणिक संस्था व सेवांमध्ये राखीव जागांचे प्रमाण ठरविले. महाराष्ट्रात नोव्हेंबर १९६१ मध्ये श्री. बी. डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. समितीने अनुसूचित जातींसाठी १३ टक्के, अनुसूचित जमातींसाठी ७ टक्के, भटक्या व विमुक्त जातींसाठी ४ टक्के आणि इतर मागासवर्गांसाठी १० टक्के असे राखीव जागांचे प्रमाण सुचविले व ते सरकारने मान्य केले. कर्नाटक राज्यात डॉ. नागनगौडा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगाने शैक्षणिक क्षेत्रात मागासवर्गीयांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याची सूचना केली. त्या शिफारशीनुसार सरकारने काढलेला हुकूम सर्वोच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविला. (बालाजी वि. म्हैसूर राज्य) त्यानंतर १९७२ साली श्री. हवनुर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगाने मागासपण ठरविण्यासाठी जात बरोबर आर्थिक परिस्थिती, राहण्याचे ठिकाण, धंदा इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन अनुसूचित जातींसाठी १४·७ टक्के, अनुसूचित जमातींसाठी ८ टक्के व इतर मागासवर्गासाठी १९ – २० टक्के असे एकूण ४१·६७ टक्के राखीव जागांचे प्रमाण ठरविले व तो अहवाल कर्नाटक सरकारने मान्य केला. तामीळनाडू सरकारने १८६९ साली श्री. संथनाम यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नियुक्त केले व आयोगाने अनुसूचित जातिजमातींसाठी १८ टक्के व इतर मागासवर्गासाठी ३१ टक्के जागा राखीव ठेवण्यास सुचविले. बिहार सरकारने १९७१ साली श्री. मुंगेरीलाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमले व आयोगाने १९७६ साली अहवाल सादर करून १२८ मागासजातींना २० टक्के जागा राखीव ठेवण्याची शिफारस केली. श्री. कर्पूरी ठाकूर मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी हा अहवाल स्वीकारून त्यानुसार सरकारी हुकूम काढला. हा निर्णय झाल्यानंतर बिहारमध्ये राखीव जागाविरोधी शक्तींनी प्रखर आंदोलन उभारले. ब्राह्मण, रजपूत, भूमिहर व कायस्थ या जाती एकत्र आल्या. यादव, कुर्मी व कोयरी या

जातींना दिलेल्या सवलतींविरुद्ध त्यांनी आंदोलनात भाग घेतला. जनता पक्षान्तर्गत वरिष्ठ जातीच्या नेतृत्वाचा कर्पूरी ठाकूरांच्या धोरणाला विरोध होता. जनता पक्षातील मतभेदावर पडदा टाकण्यासाठी पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांनी २९ डिसेंबर १९७८ रोजी खासदार बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग नेमण्याची घोषणा केली. कालेलकर आयोगाच्या शिफारशी अंमलात आणण्याचे आश्वासन जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात दिले होते. त्या आश्वासनास हरताळ फासण्यात आला.

**मंडल आयोगाची नियुक्ती**

१ जानेवारी १९७९ रोजी सहा सदस्यांचे आयोग नियुक्त करण्यात आले. आयोगासाठी जी मार्गदर्शक सूत्रे ठरविण्यात आली त्यात दोन मुख्य सूत्रे आहेत.

(१) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेले वर्ग ठरविण्यासाठी निकष निश्चित करणे.

(२) अशा मागासवर्गासाठी कोणते उपाय योजावेत याची शिफारस करणे.

या मंडल आयोगाने आपला अहवाल ११ डिसेंबर १९८० रोजी सादर केला. लोकसभेच्या अनेक सदस्यांच्या मागणीनुसार सदर अहवाल संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात आला. अहवाल सदनासमोर मांडतांना गृहमंत्री ना. ग्यानी झैलसिंग यांनी एक निवेदन दिले. आयोगाने ३७४३ जाती मागासवर्गातील ठरविल्या आहेत व आयोगाच्या शिफारशीबाबत राज्यसरकारांशी सल्लामसलत करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले. वेगवेगळया राज्यसरकारांची मते अजमावण्यासाठी अहवाल त्यांच्याकडे पाठविण्यात आला.

**मंडल आयोगाचे प्रयत्न**

आयोगाकडे सोपविण्यात आलेल्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी कोणती कार्यपद्धती स्वीकारली व कोणते प्रयत्न केले याची माहिती खंड १ च्या तिसऱ्या प्रकरणात दिली आहे. दिल्ली विद्यापीठाच्या अॅन्थ्रापॉलॉजी डिपार्टमेंटतर्फे " सामाजिक मागासलेपण " या विषयावर दोन दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले. संघराज्य, राज्यसरकार व सामान्य जनता यांच्याकडून माहिती मिळविण्यासाठी अनुक्रमे तीन प्रश्नमालिका प्रसिद्ध केल्या. १८७२ व्यक्तींनी प्रश्नमालिका भरून दिल्या तर निरनिराळया संस्थांकडून २३६८ निवेदने दाखल करण्यात आली. खासदारांनी व अनेक व्यक्तींनी आयोगापुढे साक्षी दिल्या. देशाचा सोशिओ एज्युकेशनल फिल्ड सर्व्हे (Socio Educational Field Survey) आयोगाला उपलब्ध करून देण्यात आला व हे काम करण्यासाठी श्री. एम्. एस्. श्रीनिवास यांच्या

अध्यक्षतेखाली पंधरा तज्ज्ञांची समिती नेमण्यात आली होती. मुंबईच्या टाटा समाज संशोधन संस्थेने तामीळनाडू, कर्नाटक, उत्तर प्रदेश व बिहार या चार राज्यातील मागासवर्गीय समाजाच्या चळवळींचा व त्यांच्या अवस्थेचा तुलनात्मक अभ्यास करून आपला अहवाल सादर केला. प्रत्येक जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील परिस्थितीचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी आयोगाने देशभर दौरा काढला व वेगवेगळ्या राज्यात मागासवर्गासाठी राज्यसरकारने मान्य केलेला दर्जा व त्यांच्या उन्नतीसाठी केलेले प्रयत्न याची माहिती मिळविली.

**आयोगाच्या अकरा कसोट्या**

आयोगाने अहवालाच्या चवथ्या प्रकरणात सामाजिक मागासलेपण व जात यांचा परस्परसंबंध अत्यंत मार्मिकपणे दाखविला आहे. हिंदुधर्मात वर्णाश्रम व्यवस्था हा समाजाचा पाया मानला जातो. त्यामुळे प्रत्येक माणसाची जात जन्मावरच ठरविली जाते. पारंपारिक भारतीय समाजातील सामाजिक मागासलेपण याच जातीच्या मूळ कारणावरून निर्माण होतो. त्यामुळे हिंदू समाजातील सामाजिक शैक्षणिक मागासलेपण ठरविण्यासाठी जातीचा निकष स्वीकारावा लागतो. आयोगाने जातीबरोबर मागासलेपण ठरविण्यासाठी अकरा कसोट्या (Indicators) ठरविल्या.

( १ ) लोक-समजुतीप्रमाणे ज्यांना सामाजिकदृष्ट्या मागास समजले जात आहेत अशा जाती वा वर्ग.

( २ ) आपल्या उपजीविकेसाठी पूर्णतः शारीरिक श्रमावर अवलंबून राहणाऱ्या जाती – वर्ग.

( ३ ) १७ वर्षांपेक्षा कमी वयात विवाह करणाऱ्या राज्यातील सरासरी संख्येपेक्षा ग्रामीण भागात महिलांची संख्या २५ टक्के व पुरुषांची १० टक्क्यांपेक्षा अधिक संख्या व शहरात १० टक्के महिला व पुरुषाची ५ टक्क्यांपेक्षा अधिक संख्या असलेले जाती – वर्ग.

( ४ ) राज्यातील २५ टक्क्यांपेक्षा अधिक महिला श्रमाची कामे करतात अशा जाती – वर्ग.

( ५ ) ५ ते १५ वयोगटातील अशी मुले की ज्यांनी शाळेत कधीही प्रवेश केला नाही. अशांची संख्या ज्या जातीत राज्याच्या सरासरीपेक्षा २५ टक्के अधिक अशा जाती – वर्ग.

( ६ ) ५ ते १५ वयोगटातील अशी मुले की ज्यांना शाळेचे शिक्षण अर्धवट सोडावे लागले अशाची संख्या, ज्या जातीत राज्यातील सरासरीपेक्षा २५ टक्के अधिक आहेत अशा जाती – वर्ग.

( ७ ) मॅट्रिक्युलेट विद्यार्थ्यांची संख्या ज्या जातीत राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे अशा जाती – वर्ग.

( ८ ) ज्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न राज्याच्या सरासरीपेक्षा २५ टक्के कमी आहे अशा जाती – वर्ग.

( ९ ) कच्च्या घरात राहणाऱ्यांची संख्या ज्या जातीत राज्याच्या सरासरीपेक्षा २५ टक्के अधिक आहे अशा जाती – वर्ग.

(१०) अशा जाती / वर्गातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक कुटुंबे की ज्यांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी अर्धा किलोमीटरपेक्षा दूरवर जावे लागते.

(११) खावटी कर्ज घेणाऱ्यांची संख्या ज्या जातीत राज्याच्या सरासरीपेक्षा २५ टक्के अधिक आहे अशा जाती – वर्ग.

या अकरा कसोटयांपैकी पहिल्या चार सामाजिक, पुढील तीन शैक्षणिक व शेवटच्या चार आर्थिक स्वरूपाच्या आहेत. प्रत्येक जातीचे याबाबतीत राज्यातील सरासरीशी तुलना करून मागासपण ठरविण्यात आले आहे. मागासपण ठरविण्यासाठी जात हीच कसोटी न धरता आयोगाने या निश्चित केलेल्या कसोटीवर जातीचा मागसपणा ठरविला आहे. अहवालाच्या पहिल्या खंडाच्या अकराव्या प्रकरणावर या प्रश्नांची चर्चा केली आहे.

**आयोगाच्या शिफारशी**

आयोगाने आपल्या अहवालात अनेक शिफारशी सुचविल्या आहेत त्यापैकी काही शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत–

(१) देशात हिंदू आणि बिगर हिंदू मागासवर्गीयांची लोकसंख्या ५२ टक्के आहे. त्यानुसार सर्व केंद्र सरकारी नोकऱ्यांमध्ये या वर्गातील लोकांसाठी वास्तविक ५२ टक्के जागा राखून ठेवावयास हव्यात. परंतु सर्वोच्च न्यायालयाने सर्व प्रकारच्या राखीव जागांचे प्रमाण ५० टक्यांपेक्षा अधिक असता कामा नये असा निर्णय दिला आहे. अनुसूचित जाति-जमातीसाठी २२.५ टक्क्यांची तरतूद लक्षात घेऊन अन्य मागासवर्गीयांसाठी २७ टक्के जागा राखून ठेवण्यात याव्या.

(२) ज्या राज्यामध्ये ओ. बी. सी. साठी आधीच वीस टक्क्यांहून अधिक राखीव जागा आहेत तेथे या शिफारशीने परिणाम होणार नाही.

(३) पदोन्नतीच्या बाबतीत ओ. बी. सी.ना वरीलप्रमाणे पदोन्नती देण्यात यावी.

(४) केंद्र सरकारच्या व राज्य सरकारांच्या सार्वजनिक उद्योग व राष्ट्रीयकृत बँका यांनाही राखीव जागांची पद्धत पूर्णांशाने लागू करावी.

(५) सर्व विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांना राखीव जागेच्या या योजनेत आणावे.

मंडल आयोगाने प्रत्येक राज्यातील इतर मागास जातीची यादी अहवालात नमूद केली आहे. राज्यातील इतर मागास जातीची संख्या ३७४३ असून महाराष्ट्रात २७२ जाती इतर मागासवर्गात समाविष्ट केल्या आहेत. भटक्या व विमुक्त जाती या महाराष्ट्रातील अन्य मागासवर्गीयांच्या यादीत दाखविल्या आहेत. महाराष्ट्रातील यादीचा विचार करता 'कुणबी' ही जात हल्लीप्रमाणे इतर मागास जातीत दाखविली आहे. विदर्भ व कोकण विभागात कुणबी समाजाची फार मोठी लोकसंख्या आहे. कर्नाटक राज्याच्या मागासवर्गाच्या यादीत 'मराठा' ही जात दर्शविली आहे.

### मागासवर्ग उन्नती व गरीबी हटाव

आयोगाच्या मते इतर मागासवर्गाच्या उन्नतीचा प्रश्न हा गरीबी हटाव या व्यापक राष्ट्रीय प्रश्नाचा भाग आहे. मागासवर्गाची उपेक्षा ही व्यापक प्रश्नातील खास समस्या आहे. येथे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा हा पायाभूत प्रश्न आहे. दारिद्र्य हा जातीवर आधारलेल्या पांगळे बनविणाऱ्या दोन्ही अडचणींचा प्रत्यक्ष परिणाम आहे. या दोन्ही अडचणी आपल्या समाजव्यवस्थेच्या पायातच खोलवर रुतलेल्या असल्यामुळे समाजव्यवस्थेत दूरगामी बदल करण्याची गरज आहे. आणि त्यासाठी आपल्या देशातील सत्ताधारी वर्गाच्या दृष्टीकोनात बदल घडवून आणणे हे कमी महत्त्वाचे नाही.

### आक्षेपांना उत्तर

"इतर मागासवर्गांना सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संस्था यात राखीव जागा निर्माण करण्याबाबत सत्ताधारी वर्गातील शहाण्या लोकांची वृत्ती बदलणे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. इतर मागासवर्गाची प्रचंड लोकसंख्या (५२ टक्के) लक्षात घेता दरवर्षी राखीव जागांवर काही हजार ओ. बी. सी. उमेदवारांची भरती केल्याने त्यांच्या परिस्थितीवर फार मोठा दृश्य परिणाम होणार नाही असा एक मुद्दा मांडला जातो. त्याचबरोबर राखीव जागा निर्माण करून मोठ्या प्रमाणात त्यांची भरती केल्याने गुणवत्ता व कार्यक्षमता घसरेल. राखीव जागांचा फायदा आधीच थोडे बरे असलेले लोक उठवतील आणि खऱ्या अर्थाने मागासलेले विभाग वाऱ्यावर सोडले जातील. मोठ्या प्रमाणात जागा राखीव करण्याच्या धोरणामुळे ज्या गुणवान उमेदवारांना नोकरीपासून वंचित व्हावे लागेल, त्यांच्यात जळफळाट होईल असा आणखी एक मुद्दा उपस्थित केला जातो. या विचारांना आधार नाही असे म्हणता येणार नाही, पण हे विचार आपल्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी दक्ष असणाऱ्या सत्ताधारी वर्गाचे आहेत म्हणूनच ते पक्षपाती आहेत. त्याच अर्थाने

ते तत्कालिक बाजूचा विचार करतात, पण राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात."

"इतर मागास उमेदवारांना काही हजार जागा दिल्या म्हणजे भारतीय लोकसंख्येच्या ५२ टक्के लोकसंख्या असलेल्या मागास वर्गांना पुढारलेले करता येईल असा आमचा दावा नाही, पण मागास वर्गाच्या मनातील मागासलेपणाच्या भावनेविरुद्ध त्यांच्याच मनात संघर्ष पेटविणे हा मागासपणाविरुद्धच्या लढाईचा महत्त्वाचा भाग आहे. भारतात सरकारी नोकरीला अद्यापि प्रतिष्ठा आहे आणि सरकारी अधिकारी वर्गाच्या हातात सत्ता असते. सरकारी नोकऱ्यांत मागासवर्गांचे प्रतिनिधित्व वाढल्याने त्यांच्यात देशाच्या शासनात आपण भागीदारी करीत आहोत अशी भावना निर्माण करता येते. एखादा मागासवर्गीय जेव्हा जिल्हाधिकारी किंवा पोलीस अधिक्षक होतो तेव्हा त्या पदाचे वैयक्तिक फायदे हे फक्त त्याला व त्याच्या कुटुंबियांनाच मिळतात, पण यातून जे मानसिक चक्र फिरू लागते त्याचा वेग फार मोठा असतो. त्या समाजाच्या भावना सामाजिकदृष्ट्या उंचावतात. सत्तेच्या प्रांगणात आपला माणूस पोहोचला यामुळे समाजाचे मनोधैर्य उंचावते. लोकशाही समाजात प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक समाजगटाला देशाच्या राज्यशासनात सहभागित्व मिळविण्याचा हक्क आहे आणि असे सहभागित्व मिळविण्याची आकांक्षा अत्यंत रास्त व न्याय्य आहे. ज्या व्यवस्थेत देशाच्या लोकसंख्येतील ५२ टक्के लोकांना हा हक्क बव्हंशी नाकारण्यात येतो तेव्हा त्या लोकशाहीच्या सुरक्षिततेसाठी व निरोगी विकासासाठी ही परिस्थिती तत्काळ बदलण्याची निकड असते."

"अनुसूचित जाति-जमाती व इतर मागासवर्गीय उमेदवारांची मोठ्या प्रमाणात भरती केल्याने शासकीय सेवेची गुणवत्ता कमी होते असा एक मुद्दा मांडला जातो. हा मुद्दा मांडणाऱ्यांना एक प्रश्न विचारला पाहिजे की गुणवत्तेवर निवडलेले उमेदवार प्रामाणिक, कुशल, कष्टाळू व निष्ठावान असतात काय? सध्या शासकीय सेवेतील उच्च पातळीवरील अधिकारी खुल्या स्पर्धेतून निवडले गेले आहेत. आपल्या नोकरशाहीची कामगिरी हा जर निकष लावला तर तेथे अभिमान वाटण्यासारखे काही नाही. अर्थात राखीव जागेवर निवडलेले कर्मचारी त्यांच्यापेक्षा चांगले निघतील असे आम्हाला मुळीच सुचवावयाचे नाही. सामाजिक व सांस्कृतिक मागासपणामुळे ते थोडे कमी पडण्याचा संभव आम्ही नाकारीत नाही. पण त्यांना मागासवर्गीयांच्या हालअपेष्टा आणि त्यांच्या समस्या अधिक चांगल्या माहीत असतात. हे ज्ञान अत्युच्च पातळीवरील धोरणे ठरविताना निश्चित महत्त्वाचे ठरेल.

"इतर मागास वर्गासाठी जागा राखीव ठेवल्यामुळे काही मंडळींच्या मनात द्वेष निर्माण होईल व त्यांचा जळफळाट उडेल, पण काही मंडळींचा जळफळाट सामाजिक सुधारणेविरुद्ध नकाराधिकारासारखा वापर करू द्यावयाचा का? फक्त

२० टक्के असलेल्या उच्च वर्गीयांनी इतरांवर सामाजिक अन्याय लादला त्याबद्दल त्या लोकांचा कमी जळफळाट होत असेल काय ? आता हे मागासवर्गीय कनिष्ठ जाती प्रतिष्ठा आणि सत्ता यापैकी माफक व छोटासा हिस्सा मागू लागल्याबरोबर वरिष्ठ वर्गात जळफळाट होईल अशी आरोळी उठविली जाते. मागासलेल्या वर्गासाठी राखीव जागा ठेवण्याविरुद्ध जळफळाटाचा मुद्दा म्हणजे कमालच झाली."

"वस्तुत: हिंदुसमाजातील अंतर्भूत असलेल्या जातीव्यवस्थेमार्फत राखीव जागांची योजना अतिशय कडक रीतीने आचरली जाते. एकलव्याने आपला अंगठा व शंबूकाने आपले मस्तक या जातीव्यवस्थेच्या वेदीवर वाहिले आहे. तेव्हा राखीव जागा ठेवण्याच्या तत्त्वाविरुद्ध हा उद्रेक नाही तर आतापर्यंत मक्तेदारीने मिळालेल्या सवलती आपल्याला मिळाव्या म्हणून मागणी करणाऱ्यांविरुद्ध आहे."

**आर्थिक निकष अयोग्य**

आयोगाने आरक्षणविरोधकांच्या आरोपांचे निराकरण करून आपल्या शिफारशी सादर केल्या आहेत. या शिफारशींमुळे ज्यांच्या हितसंबंधावर परिणाम होणार आहे अशापैकी काहींनी प्रतिकूल सूर काढण्यास सुरुवात केली आहे. या विरोधकांनी " राखीव जागा नष्ट करा " आणि जागा राखून ठेवावयाच्या असल्या तर आर्थिक मागासलेपण ही कसोटी लावून त्या राखून ठेवाव्यात अशी मागणी केली आहे. ही मागणी करणारे आर्थिक मागासलेपण ठरविण्यासाठी कोणता निकष लावावा हे सांगत नाही. जागा राखून ठेवण्यासाठी आर्थिक मागासलेपण ही कसोटी अनेक कारणास्तव मान्य करता येणार नाही. पहिल्या घटनादुरुस्तीच्या वेळी जी चर्चा झाली त्यावेळी " सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या " या शब्दापूर्वी 'आर्थिकदृष्ट्या' हे शब्द घालण्यात यावे ही प्रा. के. टी. शहा यांची उपसूचना नामंजूर करण्यात आली. त्यामुळे आर्थिक मागासपण हा निकष ठरवावयाचा झाल्यास घटना दुरुस्ती करावी लागेल. दुसरे कारण म्हणजे आर्थिक मागासलेपण ठरविण्यासाठी कोणताही निकष ठरविणे अत्यंत कठीण आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक ठरविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मासिक वा वार्षिक उत्पन्नाची मर्यादा घातलेली आहे. नोकरी करणाऱ्यांना ठराविक पगार मिळत असल्यामुळे त्यांच्याबाबतीत उत्पन्न काय हे ठरविणे सोपे आहे. नोकरी करणाऱ्या व्यतिरिक्त जे इतर लोक आहेत, त्यांचे उत्पन्न ठरविण्यास कोणतेही साधन किंवा यंत्रणा नाही. त्यामुळे उत्पन्नाची खोटी सर्टीफिकेटस् मिळवून सवलतीचा फायदा घेण्याचा संभव आहे, नव्हे तसा फायदा घेतल्याची अनेक उदाहरणे घडली आहेत. उत्पन्नाची मर्यादा घालताना त्या व्यक्तीवर किती जण अवलंबून आहेत ही गोष्ट हल्लीच्या नियमाच्या अंमलबजावणीच्या वेळी लक्षात घेतली जात नाही. वडीलांपासून आपण विभक्त आहोत असे सांगून उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असल्याची सर्टीफिकेटस

मिळविण्याची उदाहरणे घडलेली आहेत. आर्थिक मागासपण हा निकष न ठरविण्यास शेवटचे कारण म्हणजे सामाजिक व शैक्षणिकदृष्टचा मागासलेले समाज आर्थिक-दृष्टचाही दुर्बल असतात. सामाजिकदृष्टचा मागासलेला समाज मोठचा प्रमाणात शैक्षणिकदृष्टचा मागासलेला असतो. सामाजिक व शैक्षणिककदृष्टचा मागासलेला समाज हा आर्थिकदृष्टचा कमकुवत असतो. पुणे येथील गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेमध्ये एकेकाळी डायरेक्टर म्हणून काम केलेले श्री. नी. वि. सोहनी म्हणतात, "सामाजिकदृष्टीने पुढारलेल्या व मागासलेल्या जाती आर्थिकदृष्टचा पुढारलेल्या व मागासलेल्या आहेत हे एक सत्य आहे व ते आकडचांनी सिद्ध करता येईल. तथापि ते पुढारलेल्या वर्गाला खरे वाटत नाही असा मला अनुभव येतो."

मंडल आयोगाचा अहवाल हा मागासवर्गीयांसाठी विशेष संधीचा जाहीरनामा आहे. सामाजिक न्याय व समता ही तत्त्वे घटनेच्या शिल्पकारांनी स्वीकारली आहेत त्या तत्त्वांच्या पूर्तीसाठी मंडल आयोगाच्या शिफारशी सरकारने स्वीकारावयास पाहिजे. यासाठी इतर मागासलेल्या जातींनी सभा घेऊन ठराव करून अहवाल स्वीकारण्यासंबंधी निवेदन भारताचे पंतप्रधान व महाराष्ट्राचे मुख्य मंत्री यांच्याकडे पाठवावे.

परिशिष्ट

# महाराष्ट्रातील इतर मागास वर्गीय जातींची यादी

| अ. क्र. | इतर मागासवर्गीय जातींची नावे |
|---|---|
| १. | आग्री, आगळे अथवा कोळण |
| २. | अहिर, यादव, गवळी |
| ३. | अलिटकर |
| ४. | अत्तार |
| ५. | औधीय |
| ६. | बदक |
| ७. | बडिया |
| ८. | बगलू |
| ९. | बागडी (मारवार बावरी, मारवार वाघ्री, सलत वाघ्री) |
| १०. | बाजनिया |
| ११. | बहुरुपी |
| १२. | बैरागी, गोसावी, उदासी |
| १३. | बाजीगर |
| १४. | बाळसंथानम |
| १५. | बांडी |
| १६. | बंजारा, बंजारी, वंजार, मथुरा, बंजारा (अ) गोरा बंजारा, लांबडा, लांबरा, लंभानी, चरण बंजारा लाभन, मथुरा लभानी, काचिकिवळे बंजारा, लमाण बंजारा, लमाण/लमाणी, लाबन, ढाली/ढालिया, धाडी/ढारी, सिंगारी, नाव्ही बंजारा, जोगी बंजारा, बंजारी, शिगडे बंजारा, फानडे बंजारा, सुनर बंजारा, ढाल्या बंजारा, शिगाड्या बंजारा. |
| १७. | बंटू |
| १८. | बावरिया |
| १९. | बारी किंवा बराई |
| २०. | बारिया, कोळी बारिया |
| २१. | बाथीनी |
| २२. | बावचा |
| २३. | बेगारी, बेरड, बेडर, नायकवडी; तळवार, वाल्मिकी |
| २४. | बेसदेव |
| २५. | बेस्तर, साचलुवडुर |
| २६. | भाट |
| २७. | भडबुंजा |
| २८. | भामटा अथवा घंटीचोर अथवा परदेशी, पोंग, डासर, उचिला, रजपूत-भामटा, भामटा, भामटी कामटी, पाथरुट, ताकारी, उचले |
| २९ | भांट |
| ३०. | भंडारी |
| ३०. | अ–भंडुरा, बिल्लावर |
| ३१. | भांड |
| ३२. | भराडी, बालसंतोषी, किंग्रीवाले, नाथबावा, नाथजोगी, नाथपंथी, डवरी गोसावी. |
| ३३. | भावैया अथवा तारगला |
| ३४. | भावीण |
| ३५. | भिल्लाल |
| ३६. | भिना, कोया |
| ३७. | भोरी, खाव्वी, घिवर भोई, झिंगा |

| अ. क्र. | इतर मागासवर्गीय जातींची नावे |
|---|---|
| | भोई, परदेशी भोईर, राज भोई, भोई, कहार, गडिया कहार, किराट, मचवा, मंझी, जटिया, केवट, धिवर, धीवार, धीमर, पाळेवार, मच्छींद्र, नावाडी, मल्हार, मल्हव, गाढव भोई, खाडी भोई, खारे भोई, धेवरा, धुरिया काहर. |
| ३८. | मिस्ती अथवा पखाली. |
| ३९. | भोयर (पावरा) |
| ४०. | भुटे, भोपे |
| ४१. | बींडळी |
| ४२. | बुरबुक |
| ४३. | बुरुड, मेडर |
| ४४. | बुट्टल |
| ४५. | चादर |
| ४६. | चक्रवद्य डासर |
| ४७. | चामठा |
| ४८. | चांडाळ |
| ४९. | चाडळगडे |
| ५०. | चरण अथवा गाढवी |
| ५१. | चारोडी, छारा |
| ५२. | चेंचू अथवा चेचवार |
| ५३. | छप्परबंद |
| ५४. | चिमूर |
| ५५. | चितळा |
| ५६. | चिप्पा |
| ५७. | चित्र कथी |
| ५८. | चोधरा |
| ५९. | ख्रिश्चन (धर्मांतर झालेल्या वर्गीकृत जाती) |
| ६०. | दाबगर |
| ६१. | दाकलेरू |
| ६२. | दर्झी |
| ६३. | दास अथवा दांगडीदास |
| ६४. | देपाला |
| ६५. | देवांगा |
| ६६. | देवरी, गोसावी, नाथपंथी |
| ६७. | देवडीग |
| ६८. | देवळी |
| ६९. | धनगर, कुरुबा, कुरुबार |
| ७०. | धीमर, धिवर, गलित, हारकंत्रा, मांगेळी, मंगेले, पागे, संदुरी |
| ७१. | धोबी, परिट, वत्स, माडवळ, रजक |
| ७२. | ढोली |
| ७३. | डोमरा |
| ७४. | फकीर, बंदरवाला |
| ७५. | फुटगुडी |
| ७६. | गडबा अथवा गोडबा |
| ७७. | गडरिया |
| ७८. | गडरी |
| ७९. | गाढवी |
| ८०. | गनावी अथवा गंडाळी |
| ८१. | गंधारप |
| ८२. | गंगानी |
| ८३. | गारोडी, गारुडी |
| ८४. | गरपागरी |
| ८५. | गावंडी |
| ८६. | घडशी |
| ८७. | घिसाडी, घचिसाडी, लोहार, गाडी लोहार, चित्तोडी लोहार, रजपूत लोहार. |

| अ. क्र. | इतर मागासवर्गीय जातींची नावे |
|---|---|
| ८८. | गोल्ला, गोल्लेवार, गोलेर, गोळकर, गोल्लेर |
| ८९. | गोंधळी, गोंडाला |
| ९०. | गोपाळ, गोपाला, भोरपी, खेळकरी |
| ९१. | गोसावी, बावा, वैरागी, भारानी, गिरीगोसावी, भगई गोसावी, सरस्वती परबत, सागर बाण किंवा वाण तीर्थ आश्रम, अरण्य घरभरी, सन्यासी, नाथपंथी गोसावी |
| ९२. | गोचाकी |
| ९३. | गुजराथ बाओरी |
| ९४. | गुरव, गुरौ |
| ९५. | हबुरा |
| ९६. | हलेपाईक |
| ९७. | हरणी |
| ९८. | हटकर |
| ९९. | हेळवे, हिलव |
| १००. | हिल-रेड्डी |
| १०१. | जगीयासी |
| १०२. | जाजक |
| १०३. | जंगम |
| १०४. | जतिगर |
| १०५. | जारीया |
| १०६. | जवेरी, जोहारी |
| १०७. | झाडी |
| १०८. | जिगर |
| १०९. | जोगी, नाथ, नाथजोगी गोमाई, देवोरी |
| ११०. | जोगीण |
| १११. | जोशी, बुड्डकी, डमरूवाले, कुडमुडे, मेढांगी, मरोडे, महादेव जोशी, सरवडे, सारोडा. |
| ११२. | जुलाहा, विणकर, वानकर, वन्य, वनकर |
| ११३. | कच्छी कछीआ |
| ११४. | कचोरा |
| ११५. | कडेरा |
| ११६. | कैकाडी (जिथे ते वर्गिकृत जातीत नाहीत) कोरच, घोंतळे, कोरवा अथवा कोचीकोरवा, माकडवाले, पाडलोर कोरवी |
| ११७. | कलाल, कालर, लाड, लाडवक, गोंड कलाल, शिवहारे |
| ११८. | कामटी |
| ११९. | काम्मी |
| १२०. | कांडेल |
| १२१. | घरा, कांजार, नाट |
| १२२. | कापडी |
| १२३. | कासार, कासेरा |
| १२४. | कसबी |
| १२५. | कसाई, खाटीक, कसब |
| १२६. | काशी कापडी |
| १२७ | काटाबू |
| १२८. | काथर, काथरवाणी, काथहरवाणी (लिंगायतवाणी अथवा लाडवाणी वगळून) |
| १२९. | कंथी, खटी |
| १३०. | कटीपामुबा |
| १३१. | खाखा, अथवा खाखी |
| १३२. | किरार |
| १३३. | कोल्हाटी, डोंबारी |
| १३४. | कोष्टी, कोष्टी-सूर्यवंशी, मल्हार |

| अ. क्र. इतर मागासवर्गीय जातींची नावे | अ. क्र. इतर मागासवर्गीय जातींची नावे |
|---|---|
| कोळी, ख्रिश्चन कोळी | १६४. मंगाळा |
| १३५. कोराचाम अथवा येरकुला, कोरवे | १६५. मारवार बोवरी |
| १३६. कोरचर | १६६. मसणजोगी, सुदगा-दसिद्ध मापनजोगी |
| १३७. कोरवा कोडकू (धरून) | १६७. मथुरा |
| १३८. कोमकापू | १६८. मतियारा मतीहारा |
| १३९. कोंडू | १६९. मंकर-खळु |
| १४०. कोंगाडी | १७०. मे |
| १४१. कोष्टी, काशकोटी-देवांग | १७१. मिना |
| १४२. कुचबंध | १७२. मिथा |
| १४३. कुच्छीरा | १७३. मोमीन (विणकर) |
| १४४. कुंभार, कुम्हार | १७४. मोंडीवार, मोंडीवारू |
| १४५. कुणबी | १७५. मुंडा |
| १४६. कुन्हीणशेट्टी | १७६. नामधारी, पाईक |
| १४७. कुरमार | १७७. नंदीवाला, तिरमल |
| १४८. लाभा | १७८. नकाशी |
| १४९. लडाफी, लडफ | १७९. नावी, न्हावी, हजाम, कळसेरू नवलिगा, कळाशी, नाभीक, नेई |
| १५०. लाडीया, लाढीया, लारिया | १८०. नीली |
| १५१. लखेरा, लाखारी | १८१. निळकंठी |
| १५२. लांझद | १८२. नेकार, जाडा |
| १५३. लोहार, लोहार-गडा, दोदी खटवली, पांचाळ | १८३. निओ बुद्धीष्ट, नवबौद्ध |
| १५४. लोणारी, चुनारी | १८४. नेथुरा |
| १५५. मच्छी, तांडेल | १८५. निळगर, निराली |
| १५६. मगा | १८६. निर्शिकारी |
| १५७. मछली-महली | १८७. नोनिया |
| १५८. महील | १८८. ओतारी, ओतणकर, ओतकर, वतारी, ओझारी |
| १५९. मैघामी | १८९. पछ भोटला, पच बोटला |
| १६०. मेरल, दांगट, वीर | १९०. पधारीया |
| १६१. मझवार | १९१. पदमपरी |
| १६२. माळी, फूलमाळी | |
| १६३. मानभव | |

| अ. क्र. | इतर मागासवर्गीय जातींची नावे |
|---|---|
| १९२. | पडीयार |
| १९३. | पखाली भिस्ती |
| १९४. | पालपारधी |
| १९५. | पमुला पांचाळ |
| १९६. | पांछमा |
| १९७. | पंडा |
| १९८. | पांगुळ |
| १९९. | पाणका |
| २००. | पाटकर |
| २०१. | पत्रयवेरू |
| २०२. | पेरकी |
| २०३. | फार |
| २०४. | फासेचारी |
| २०५. | फुडगी |
| २०६. | फलारी |
| २०७. | पिंजारा, पिंजारी |
| २०८. | पुखाली |
| २०९. | पुटलीगार |
| २१०. | रचबंधीया |
| २११. | रचेवार |
| २१२. | रचकोया |
| २१३. | रघवि |
| २१४. | रैकारी |
| २१५. | राजपारधी, गावपारधी, हरण-शिकारी |
| २१६. | रजपूत भामटा परदेशी, भामटा, परदेशी भामटी |
| २१७. | रामोशी |
| २१८. | नौन, रौटीया, रावत |
| २१९. | रंगारी, रंगरेज, भावसार |
| २२०. | रौंटीया |
| २२१. | रावळ, रावळ, किंवा रावळयोगी |
| २२२. | सदीस, सैस, शीस |
| २२३. | साळी, पदमसाळी, स्वकुळसाळी |
| २२४. | सणगर |
| २२५. | सणगारी |
| २२६. | संजोगी |
| २२७. | संताळ |
| २२८. | सवनाटा किंवा सौता |
| २२९. | सौतेळी |
| २३०. | सपेरा |
| २३१. | सरनिया |
| २३२. | सरे |
| २३३. | शिळावट |
| २३४. | शिंपी, भावसर, शिवशिंपी नामदेव |
| २३५. | शिगडव अथवा शींगडच |
| २३६. | सिक्कळगर, कोटारी |
| २३७. | सिंधोर |
| २३८. | सिंगीवाला |
| २३९. | सोनार |
| २४०. | मोरे |
| २४१. | मुन्ना |
| २४२. | मुन्नाई, सुथारिया |
| २४३. | मुतार, भडई, वडई |
| २४४. | मुपलिग |
| २४५. | टाकणदार |
| २४६. | टकारी |
| २४७. | तळवार कानडे |
| २४८. | तांबट |
| २४९. | तांबोळी |
| २५०. | तरगळा |
| २५१. | तेली, गनिगा, घंची |

| अ. क्र. | इतर मागासवर्गीय जातींची नावे |
|---|---|
| २५१. | ठक्कर |
| २५२. | थेलारी |
| २५३. | थेरवार |
| २५४. | थोगटी-थोगटी |
| २५५. | थोटेवाडू |
| २५६. | थोरिया |
| २५७. | तिमाळी |
| २५८. | वाघरी, बाघरी, मलत, सळत-वाघरी |
| २५९. | वैदू |
| २६०. | वैती |
| २६१. | वाळवई |
| २६२. | वंजारी वंजर |
| २६३. | वामवा |
| २६४. | वासुदेव |
| २६४. | विठोलिया |
| २६५. | वडुर, वड्डेर (काळवडेर अथवा पाथरोड) बेलदार किंवा गिरणीवडर, वडर, गाडीवडर, जातीवडर, मातीवडुर, पाथरवट |
| २६६. | वाडी |
| २६७. | वंजारी, वंजारा |
| २६८. | वामफोडा |
| २६९. | वर्थी |
| २७०. | वानडी |
| २७१. | येंडीवड |
| २७२. | येरागोला वड अथवा थेल्ला पामलवड |

* शूद्र अति शूद्रांना शैक्षणिक व नोकरीविषयक सवलती देण्यासंबंधीचा विचार महात्मा फुले यांनी पहिल्या प्रथम मांडला.

* " जे समान आहेत त्यांच्यात समानता असू शकते. समान आणि असमान यांना एका मापाने मोजणे म्हणजे असमानता अखंड राखणे होय. "

* इतर मागासलेल्या वर्गाची लोकसंख्या ५२ टक्के आहे. त्यांच्यासाठी त्याच प्रमाणात जागा राखून ठेवावयास पाहिजे, पण सर्वोच्च न्यायालयाने राखीव जागांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा कमी असले पाहिजे. असा एका निवाड्यात निर्णय दिला. त्यामुळे मंडल आयोगाने इतर मागासलेल्या जातीसाठी २७ टक्के जागा राखीव ठेवण्याची शिफारस केली.

* अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी ज्या जागा आजपर्यंत राखीव ठेवण्यात आल्या आहेत, त्या मंडल आयोगाच्या शिफारशीत कायम ठेवल्या आहेत.

* अनुसूचित जातीतील ज्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला त्यांना अनुसूचित जातीच्या सवलती महाराष्ट्र सोडून इतर राज्यात मिळत नव्हत्या. या नव-बौद्धांनासुद्धा मागास वर्गाच्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.

* ज्यांनी धर्मांतर केले अशा वर्गीकृत जातींना आयोगाने मागास वर्गात दाखल केले आहे.

* बिगर हिंदू धर्मातील मागासवर्गीयासाठी " धर्मांतरित अस्पृश्य " व " पारंपारिक धंदे " असे निकष आयोगाने स्वीकारले आहेत.

* मंडल आयोगाने हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, नव-बौद्ध धर्मातील मागासवर्गीय जातीव्यवस्थेचे बळी आहेत हे सत्य देशापुढे मांडून त्यांना विशेष संधी देण्याची शिफारस केली आहे.

* आयोगाच्या शिफारशी शासकीय, निम-शासकीय, सरकारी उद्योग समूह सेवा व शैक्षणिक संस्था यांच्याच बाबतीत आहे.

भारताचे पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतदादा पाटील यांना पाठवावयाच्या निवेदनाचा मसुदा खाली देण्यात आला आहे. त्याप्रमाणे आपण जास्तीत जास्त लोकांच्या सह्या घेऊन निवेदन पाठवावे.

# निवेदन

प्रति,

मा. श्रीमती इंदिरा गांधी
पंतप्रधान
भारत सरकार – नवी दिल्ली

भारतीय राज्यघटनेत १९५० साली अनुसूचित जाती जमातीप्रमाणे सामाजिक व शैक्षणिक दृष्टचा मागासलेल्या अन्य मागासवर्गीयांच्या (ओ. बी. सी.) विकासार्थ कलम ३४०–४६. १५(४) व १६(४) अन्वये खास तरतूद करण्यात आली होती. परंतु केंद्र सरकारने घटनेतील वरील कलमांचा आदर करून त्यांची कार्यवाही करण्याचा प्रयत्न न केल्यामुळे गेली ३५ वर्षे देशातील अन्य मागास वर्गीयांना विकासाच्या विशेष सवलती व संरक्षणापासून वंचित रहावे लागले आहे.

१९७९ साली पी. पी. मंडल यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या मागासवर्गीय आयोगाने अन्य मागासवर्गीयांची अत्यंत शास्त्रीय व वस्तुनिष्ठ पद्धतीने व्याख्या करून इतर मागास जातींची यादी तयार केली व त्यांच्या विकासार्थ अनेक शिफारशी अहवालात केल्या आहेत. आयोगाने मागासवर्गीयांच्या व्याख्येसाठी स्विकारलेला जातीचा निकष व सामाजिक मागासलेपणा योग्य असून महाराष्ट्रात २७२ जातींचा ओ. बी. सी.मध्ये समावेश करून अचूक यादीही सादर केलेली आहे. तेव्हा केंद्र सरकारने मंडल आयोगातील शिफारशींना त्वरीत मंजुरी देऊन विनाविलंब कार्यवाही करावी व देशातील मागासवर्गीय जनतेला सामाजिक न्यायहक्क मिळवून द्यावेत असे ह्या निवेदनाद्वारे नम्र आवाहन करीत आहोत, कळावे.

आपला नम्र

शुभेच्छा !

लक्झरी टुरीस्ट-टॅक्सी सर्व्हीस मधील विश्वासु नांव

# स फ र

संपर्क : हॉटेल पथिक
जंगली महाराज पथ,
पुणे ४११ ००४

फोन नं. ५९०८५



प्रकाशक : श्री. कृष्णकांत शंकरराव कुदळे, सरचिटणीस
राष्ट्रीय मागास वर्ग, अनुसूचीत जाती, जमाती व अल्पसंख्याक महासंघ
(महाराष्ट्र) (पुणे शहर शाखा.)
पत्ता–१२६३/३, आनंद भुवन जंगली महाराज पथ, पुणे ४११ ००४.

मुद्रक गणेश आर्टस्, सर्व्हे नं ३६ प्लॉट नं. १९, पर्वती दर्शन, पुणे ९